नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ९७ Issue - 97 | वार - सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२६ Blow- Monday Date 31 AUGUST 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मराठा आंदोलनप्रश्नी मार्ग काढू, मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

### सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत सकारात्मक : मंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मराठा समाजाच्या ज्या मागण्या आहेत त्यातील कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या मागण्यांवर सकारात्मक विचार होईल आणि मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे ठोस आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ते नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते. तर राधाकृष्ण विखे पाटील हे चर्चा करत आहेत आणि एक-दोन दिवसात तोडगा निघेल, असा विश्वास राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केला. सरकार मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत सकारात्मक असल्याची माहिती दत्तात्रय भरणे यांनी दिली.

मराठा समाजाला न्याय देतानाच ओबीसी, बहुजन, आदिवासी आणि अन्य सर्व समाजघटकांच्या हक्कांचे संरक्षण करून सर्वसमावेशक विकास साधणे, ही महायुती सरकारची भूमिका असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परभणीतील शेतकरी व युवा संवाद मेळाव्यात



सांगितले. मराठा समाजाच्या हितासाठी महायुती सरकारने आतापर्यंत विविध निर्णय घेतले आहेत. ५२०० अधिसंख्य पदांवरील उमेदवारांना नोकरी, न्यायमूर्ती शिंदे समितीमार्फत लाखो नोंदींची तपासणी, कुणबी प्रमाणपत्रांचा मार्ग, १० टक्के आरक्षण, सारथीला ३०० कोटी, अण्णासाहेब पाटील महामंडळाची कर्जमर्यादा १५ लाख रुपये, वसतिगृह व उच्च शिक्षणासाठी मदत, तसेच आंदोलनातील मृतांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपये आणि पात्रांना एसटीमध्ये नोकरी हे सर्व निर्णय महायुती सरकारनेच घेतल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.


दरम्यान मराठा समाजातील पात्र व्यक्तींना लवकर कुणबी प्रमाणपत्र द्यावे, हैदराबाद गॅझेटिअरची अंमलबजावणी करावी या मागण्या करत यासाठी मराठा समाजातील प्रतिनिधींनी नव्याने आंदोलन सुरू केले आहे. या पार्श्वभूमीवर कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या मागण्यांवर सकारात्मक विचार होईल आणि मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे.

## ओरिजनल पैठणीवर येणार बारकोड अन् लोगो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : पैठणी म्हणजे महिलांच्या सौंदर्य खुलवणारं वस्त्रभूषण आहे, खेळ पैठणीच्या माध्यममातूनही पैठणी हा वस्त्रअलंकार घराघरात पोहोचला आहे. तसेच, सणासाठी, लग्नासमारंभासाठीही पैठणीची वेगळीच क्रेझ महिला वर्गात पाहायला मिळते. मात्र, ओरिजनल पैठणी म्हणत, सेमी पैठणी आणि डुप्लीकेट पैठणी देखील बाजारात विकली जाते. मात्र, आता याच सेमी पैठणी आणि ओरिजनल पैठणीतील फरक स्पष्ट होणार आहे. राज्याच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाने त्यासाठी नवी शक्कल लढवली असून ग्राहकांना दोन्हीतील फरक समजून पैठणी खरेदीपासून त्यांची होणारी फसवणूक टळणार आहे. राज्याचे स्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी पंढरपुरातून याबाबत माहिती दिली.

ग्राहकांना खरी पैठणी ओळखता यावी यासाठी आता पैठणीवर एक बारकोड आणि लोगो बनवण्याचा प्रयत्न वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून सुरू आहे. त्यामुळे, पैठणी खरेदी करणाऱ्या ग्राहकांची फसवणूक होणार नाही, अशी माहिती राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी दिली. आज पंढरपूर येथे विठ्ठल दर्शनासाठी आले असता सावकारे यांनी माध्यमांच्या प्रश्नांना उत्तरे देत याबाबत सांगितले. संजय सावकारे



यांनी विठ्ठल मंदिरात येऊन दर्शन घेतले. यावेळी पंढरपूर मंगळवेढ्याचे आमदार समाधान आवताडे आणि पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. खऱ्या पैठणीची ओळख होण्यासाठी बारकोडच्या माध्यमातून कोणता धागा वापरलाय, कोणत्या गावात कोणत्या कारागिरांनी ही पैठणी तयार केली याची संपूर्ण माहिती ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. त्यामुळे बनावट पैठणी ओळखता येणार असल्याचे सावकारे यांनी सांगितले. पैठणी महाराष्ट्राच्या संस्कृतीचा भाग आहे. त्यामुळे पैठणीला मागणी खूप आहे, तो एक कलेचा भाग आहे, एक पैठणी तयार करायला २० ते ३० दिवस एवढा कालावधी कारागिरांना लागतो. पैठणीचे उत्पादन वाढवण्यासाठी कामगारांची संख्या वाढवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सुद्धा विभागाकडून प्रयत्न सुरू आहेत. पैठणी विक्रीसाठी वस्त्रोद्योग विभागाच्या माध्यमातून आम्ही प्रदर्शन भरवत असतो, त्यामधून सुद्धा पैठणी खरेदीसाठी चांगली मागणी मिळत असल्याचे सावकारे यांनी सांगितले.

मराठा बांधवांच्या मागण्या मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवणार

दरम्यान, मराठा तरुणांनी विठ्ठल मंदिरापाशी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांना मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करण्याबाबत निवेदन दिले. यावेळी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष किरण राज घाडगे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. मनोज जरांगे यांचे सुरू असलेले उपोषण बाबत मराठा तरुणांनी दिलेले निवेदन मुख्यमंत्र्यांकडे पाठविणार असून मुख्यमंत्री हे जरांगे पाटील यांच्या काही त्रुटी असतील तर त्या नक्की दूर करतील असे त्यांनी सांगितले. लक्ष्मण हाके यांच्या मोर्चा बाबत बोलताना, सरकारला सर्व घटकांना घेऊन पुढे जावे लागत असते. त्यामुळे राज्यातील सर्वच घटकांच्या मागण्या मुख्यमंत्री पूर्ण करतील असा विश्वास वस्त्रोद्योग मंत्र्यांनी व्यक्त केला.



## डबल इंजिन सरकार शेतकऱ्यांसह महिला व युवकांच्या पाठीशी खंबीर : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परभणी : राज्यातील शेतकऱ्यांसह लाडक्या बहिणी व युवकांच्या पाठीशी केंद्र व राज्यातील हे डबल इंजिन सरकार खंबीरपणे उभे राहील व विकास कामांकरीता निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज रविवारी परभणीत आयोजित केलेल्या शेतकरी व युवा संवाद मेळाव्यातून दिली.

येथील स्टेडिअम मैदानावर शिवसेनेच्या वतीने रविवारी दुपारी शेतकरी व युवक संवाद मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री शिंदे, राज्याचे वित्त व राज्य मंत्री आशिष जयस्वाल, संयोजक तथा खासदार संजय जाधव, खासदार संजय देशमुख, माजी आमदार शंकरराव धोंडगे, आमदार हिकमतराव उढान, शिवसेनेचे संपर्क प्रमुख आनंद जाधव, आमदार सईद खान, जालना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे, परभणी जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, जिल्हा प्रमुख विशाल कदम, माजी खासदार सुरेश जाधव, माजी आमदार हरिभाऊ लहाने, परभणीचे प्रथम महापौर प्रताप देशमुख, शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख भास्कर लंगोटे, संपर्कप्रमुख राजू कापसे यांच्यासह अन्य मान्यवर व्यासपीठावर विराजमान होते.

सरकारच्या तिजोरीवर सर्वसामान्य शेतकर्यांचा पहिला हक्क व अधिकार आहे, असे नमूद करीत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महायुती सरकारने आपल्या कारकिर्दीत सातत्याने शेतकरी हिताचेच निर्णय घेतले आहेत. शेतकरी सन्मान योजनेतून राज्य व केंद्रातील डबल इंजिन सरकारने प्रतिवर्षी १२ हजार रुपयांचे अनुदान शेतकर्यांच्या खात्यात जमा केले आहेत. मायबाप शेतकर्यांच्या आपत्तींतसुध्दा हे सरकार शेतकर्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली अलिकडे महायुती सरकारने अहिल्याबाई होळकर कर्जमुक्तीचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या योजनेतूनच परभणी जिल्ह्यात ५०८ कोटी रुपयांची कर्जमाफी झाली आहे, अशी माहिती दिली. राज्य व केंद्रातील सरकार शेतकर्यांना कधीही वार्यावर सोडणार नाही, शेतकर्यांच्या अडी अडचणीत हे सरकार निश्चितपणे शेतकर्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, अशी ग्वाहीही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

महिलांकरीताही या सरकारने बहुतांशी निर्णय घेतले आहेत. त्याद्वारे महिलांचा सन्मान वाढावा या दृष्टीने प्रयत्न केले आहेत. लाडकी बहिण सारखी योजना महिलांना सन्मान देणारी ठरली आहे. या लाडक्या बहिणी लखपती व्हाव्यात, या दृष्टीनेही हे सरकार निश्चितपणे प्रयत्न करणार आहे, असे स्पष्ट करतेवेळी शिंदे यांनी महिलांचा आत्मसन्मान राखला जाईल, अशी ग्वाही दिली.

राज्यातील युवकांनाही मोठ्या प्रमाणावर कामे मिळावीत या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. विशेषतः युवा शक्तीत मोठी ताकद आहे. युवक कष्टाळू आहेत. या युवकांना संधी मिळाली पाहिजे, ती संधी निश्चितपणे दिली जात आहे. युवकांच्या कौशल्य विकासाकरीता सारे प्रयत्न सुरु आहेत. स्टार्टअप, पॅकेजींग वगैरेसारख्या गोष्टींना मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात आहे. एआयच्या माध्यमातून भविष्यात युवकांना मोठ्या प्रमाणावर काम मिळणार आहे. युवकांच्या पाठीशी हे सरकार निश्चितच खंबीरपणे उभे राहील, असे ते म्हणाले. युवकांनी चेंजमेकर बनले पाहिजे, बदल घडविले पाहिजे, नोकरीच्या मागे लागण्याऐवजी नोकरी देणारे बनले पाहिजे, असे आवाहनही केले. परभणी शहरासह जिल्ह्याच्या विकासाचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. या सर्व प्रश्नांची हे सरकार निश्चितपणे दखल घेऊ लागले आहे. 'जगात जर्मनी, भारतात परभणी' या म्हणीप्रमाणे परभणी प्रत्यक्षात साकार व्हावी, या दृष्टीने हे सरकार मोठ्या प्रमाणावर पाऊले उचलील असा विश्वास व्यक्त करतेवेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी परभणी जिल्ह्यातील पायाभूत सुविधांसह विकासाकरीता दीड हजार (पान २ वर....)

## पोहण्यासाठी गेलेल्या तरुणांवर काळाचा घाला, कळवा खाडीत बुडून तीन जणांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : ठाणे जिल्ह्यात धक्कादायक घटना घडली आहे. कळवा खाडी, रेतीबंदर गणेश घाट याठिकाणी दुपारी पोहण्यासाठी गेलेल्या तीन तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. मृत्यू झालेले तीनही तरुण हे मुंब्र्यातील असल्याची माहिती मिळत आहे. मुंब्र्यातील ठाकूर पाडा इथं हे तरुण राहत होते. दरम्यान, या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते.



मिळालेल्या माहितीनुसार, आलम सय्यद (वय ४२ वर्ष) रिझवान सय्यद (वय ४२ ) आणि साहिल पोलंदाज (वय २८) अशी कळवा खाडीत बुडून मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत. ठाणे महापालिकेच्या ढऋझ जवानांकडून तिन्ही मृतदेह शोधून बाहेर काढण्यात यश आले आहे. तिन्ही मृतदेह शिवविच्छेदनासाठी कळवा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, या घटनेमुळं मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान, हे तिन्ही तरुण नेमके कसे बुडाले याबाबतची माहिती अद्याप मिळालेली नाही. मात्र, कळवा खाडी, रेतीबंदर गणेश घाट परिसरात पोहण्यासाठी जाणं तरुणांच्या जीवावर बेतले आहे. एकाच वेळी तीन तरुणांचा बुडून मृत्यू झाल्यानं हळहळ व्यक्त केली जात आहे. हे तिनही तरुण मुंब्र्यातील ठाकूर पाडा येथील रहिवासी असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन घटनास्तली दाखल झाले होते. तसेच ठाणे महापालिकेचे टीडीआरएफ जवान देखील घटनास्थळी दाखल झाले होते. माहिती मिळाल्यानंतर लगेच बचावकार्य देखील सुरु करण्यात आले होते. मात्र, तिनही तरुणांचा मृत्यू झाला आहे. जवानांनी तिनही मृतदेह शोधून बाहेर काढले आहेत. शिवविच्छेदन करण्यासाठी मृतदेह रुग्णालयात नेण्यात आले आहेत.

**मुलांना वाचवलं मात्र स्वतःचा जीव गेला**

**याआधीही पुराचा तडका बसला; बचावकार्य युद्धपातळीवर सुरु**

## मास्तरांना कडक सॅल्यूट! महापुरासारखा काळ समोर असताना १६४३ विद्यार्थ्यांना वाचवलं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

काठमांडू : नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी महापुरात सगळंच उद्ध्वस्त झालं. मृतांचा आकडा वाढतच चालला आहे. अजूनही २ हजारहून अधिक लोक बेपत्ता आहेत. या महापुरात शाळा , कॉलेज देखील उद्ध्वस्त झाली आहेत. अशात मुख्याध्यापकाच्या प्रसंगावधानामुळे १६४३ विद्यार्थ्यांचा जीव वाचला आहे. शाळेतील सर्व मुले आणि शिक्षक जवळच्या एका टेकडीवरील पिंपळाच्या झाडाखाली पोहोचले. त्यांच्या डोळ्यादेखत काही क्षणात महापुराच्या पाण्यात तीन मजली शाळा वाहून गेली.

या महापुराने शाळेतील एक शिक्षक आणि शिपाई यांनाही वाहून नेले. त्यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. सुदैवाने या संकटात शाळेत शिक्षणासाठी आलेल्या १६४३ विद्यार्थ्यांचा जीव बचावला आहे. शाळेच्या मुख्यध्यापकांना संकट येत असल्याची चाहूल आली आणि त्यांनी तातडीने शाळेच्या विद्यार्थ्यांना सुरक्षितस्थळी नेलं. त्यांना आलेल्या एका फोनमुळे हजारोहून अधिक मुलांचे प्राण वाचले.

त्रिभुवन त्रिशूली माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र दवडी यांना बुधवारी ९:२० ला त्यांच्या एका मित्राचा कॉल आला. नदीच्या महापुरात आमचे गाव वाहून गेलं आहे. तुम्ही तिथून पळा, असे त्यांनी सांगितले. त्यावेळी त्या शाळेत १६४३ मुले ३ मजली इमारतीमध्ये होती.

सुरुवातीला त्यांना शाळा सुरक्षित वाटली. कारण शाळा नदीपासून ६० मीटर उंचीवर आहे. मात्र एका पालकाने धावत येऊन सांगितले की, पाणी अत्यंत वेगाने वाढत आहे. दवंडी यांनी काहीच विचार न करता तातडीने शाळेची घंटा वाजवली. शिक्षकांना वर्ग रिकामे करण्यास सांगितले. त्यांनी शाळेच्या बस चालकांना कॉल केला, त्यांना परत जाण्यास सांगितले.

एका बस चालकाशी संपर्क होऊ शकला नाही. ती बस त्या पुलावरून जातांना त्यांना दिसली. एक मुलगी घाबरल्यामुळे तिला पॅनिक अटॅक आला. तिला बाईकवरून डोंगरावर नेण्यात आले. बाकी सर्व मुले पायी वर पळाली. सर्व मुलांनी पिंपळाच्या एका झाडाखाली आश्रय घेतला. त्यांच्या डोळ्यादेखत शाळेची इमारत वाहून गेली. एक शिपाई आणि शिक्षकांशिवाय मुख्याध्यापकांनी शाळेलतील १६४३ मुले आणि शिक्षकांचे जीव वाचवले. मुख्याध्यापकांच्या प्रसंगावधानामुळे मुलांचे प्राण वाचले.





मुलांना वाचवलं मात्र स्वतःचा जीव गेला

संतोष पेरियार (वय ३२) असे मृत्यू झालेल्या शिक्षकाचे नाव आहे. ते सामाजिक इतिहासाचे शिक्षक होते. संतोष पेरियार हे नदीकाठी असलेल्या त्यांच्या भाड्याच्या खोलीत नाश्ता बनवण्यासाठी गेले होते. त्यावेळी ते महापुरातवाहून गेले. तर शाळेचे शिपाई सुलतान लामा यांचा देखील मृत्यू झाला. सुलतान लमा हे शाळेचे दरवाजे बंद करण्यासाठी गेले होते. त्यावेळी ते देखील महापुरात वाहून गेले आणि त्यांचा मृत्यू झाला.

मुलांना वाचवल्याबद्दल स्थानिकांनी त्यांना हिरो म्हटलं, मात्र त्यांनी 'मी दुसरं काय करू शकलो असतो' असे म्हटलं. मी आता बत्तर येथे पोहोचलो आहे. जेव्हा आम्ही शाळेतून बाहेर पडलो, तेव्हा आम्ही टेकडीच्या दिशेने धावत गेलो. तिथे जे काही उपलब्ध होईल त्याआधारे आम्ही दिवस काढले. आम्ही तिथे जवळपास अडकूनच पडलो होतो. माझ्यासोबत जवळपास ४० ते ५० कर्मचारी होते, असे दावडी यांनी सांगितले.

महापूर आलेल्या रसुवा जिल्ह्याला याआधीही पुराचा तडाखा बसला आहे. एप्रिल २०१५ मध्ये ७.८ तीव्रतेच्या भूकंपामुळे हिमस्खलन झाले होते. या हिमस्खलनाखाली 'लांगटांग' मधील सर्व ३०० रहिवासी गाडले गेले होते. तर दक्षिण आशियात ८,९६२ लोकांचा बळी घेतला होता. नेपाळमध्ये आलेल्या महापुरात ७०० हुन अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. तर २५०० पेक्षा अधिक जण बेपत्ता आहेत. बेपत्ता असलेल्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरु आहेत. बचावकार्य युद्धपातळीवर सुरु आहे. यामध्ये विदेशी नागरिकांचा समावेश आहे. पुरातअडकलेले काही भारतीय नागरिक नेपाळमधून सुरक्षित परतत आहेत. तर काही अजूनही बेपत्ता आहे. त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरु असून त्यांचा शोध घेतला जात आहे.

## संपादकीय....

### सर्वसमावेशक भागीदारी

भारत-चिली आर्थिक भागीदारी अधिक बळकट करण्यासाठी खुल्या दृष्टिकोनासह सातत्यपूर्ण सहभाग आणि संतुलित दृष्टिकोन राखण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा भारताने पुनरुच्चार केला आहे. दोन्ही देशांतील व्यवसाय आणि जनतेसाठी अर्थपूर्ण संधी निर्माण करण्यावर यामध्ये भर देण्यात आला आहे. ग्लोबल साउथचे सदस्य म्हणून भारत आणि चिली यांची समान ओळख, तसेच दोन्ही देशांची समान धोरणात्मक दृष्टी, द्विपक्षीय आर्थिक सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी आणि सामायिक समृद्धीला पुढे नेण्यासाठी म जबूत आधार प्रदान करते. भारत-चिली सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी कराराच्या वाटाघाटींना पुढे नेण्यासाठी वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी २६ ऑगस्ट २०२६ रोजी चिलीची राजधानी सँटियागो येथे, चिली प्रजासत्ताकाच्या आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध विभागाच्या उपमंत्री पॉला एस्तेव्हेझ वाइनस्टीन यांची भेट घेतली. दोन्ही बाजूंनी भारत-चिलीमधील मजबूत आणि सातत्याने वाढत असलेल्या संबंधांना आणखी बळकटी देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच, सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी कराराच्या माध्यम ातून दोन्ही देशांची सामायिक उद्दिष्टे आणि आकांक्षा प्रत्यक्ष आणि व्यावसायिकदृष्ट्या अर्थपूर्ण संधींमध्ये रूपांतरित होतील, याची खात्री करण्यावर भर देण्यात आला. वाणिज्य सचिवांनी आरोग्यसेवा, औषधनिर्माण, ऊर्जा, खनिजे, कृषी, यंत्रसामग्री आणि अभियांत्रिकी यांसह विविध क्षेत्रांमध्ये आर्थिक सहकार्य वाढविण्याच्या मोठ्या शक्यतांवर प्रकाश टाकला. सर्वसमावेशक आर्थिक भागीद- ारी कराराच्या वाटाघाटी यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यास, दोन्ही देशांमधील वाढता द्विपक्षीय व्यापार आणि आर्थिक भागीदारीला आणखी चालना मिळेल. यावर्षीच सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी कराराच्या वाटाघाटी पूर्ण करण्यासाठी भारत वचनबद्ध आहे. दोन्ही देशांतील व्यवसायांसाठी न्याय्य आणि व्यावसायिकदृष्ट्या अर्थपूर्ण परिणाम सुनिश्चित करणारी, संतुलित आणि परस्पर लाभदायक चौकट निर्माण करणे हा यामागील उद्देश आहे. या सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारामुळे व्यापार आणि गुंतवणुकीच्या अधिक संधींचे नवे मार्ग खुले होण्याची अपेक्षा आहे. त्याचबरोबर तंत्रज्ञान, मनुष्यबळ आणि लवचिक पुरवठा साखळी या क्षेत्रांमध्ये सहकार्याला चालना मिळेल. यामुळे भारत आणि चिली यांच्यातील दीर्घकालीन आर्थिक सहकार्यासाठी अधिक भक्कम पाया तयार होईल.

## डबल इंजिन सरकार शेतकऱ्यांसह महिला व युवकांच्या पाठीशी खंबीर : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

कोटींच्या योजना आणल्या आहेत. यातून कृषि क्षेत्रातील जोडधंदे, शेतीच्या तंत्रास प्रोत्साहन, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ वगैरेंना प्रोत्साहन दिले जाणार आहे. परभणी महानगरांतर्गत रस्ते, नाल्या, पाणी पुरवठा, घनकचरा या प्रकल्पांना सर्वतोपरि निधी दिला जाईल. या व्यतिरिक्त नवीन एमआयडीसीचा प्रश्न तात्काळ मार्गी लावला जाईल, जिल्हा क्रिडा संकुलासाठी जागा उपलब्ध केली जाईल, कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी तात्काळ केली जाईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

# वनाधिपती विनायकदादा पाटील प्रतिष्ठानचा शुभारंभ उत्साहात

निफाड प्रतिनिधी : वनाधिपती विनायकददा पाटील प्रतिष्ठानच्या शुभारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून खासदार सुप्रियाताई सुळे यांनी अत्यंत भावनिक शब्दांत विनायकदादांच्या आठवणींना उजाळा दिला. त्या म्हणाल्या, म ाझ्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत महत्त्वा-चा आहे. कारण विनायकदादा केवळ राजकीय नेते नव्हते, तर ते माझे काका होते.विनायकदादानी कोणत्याही एका पक्षाचे नेतृत्व नव्हते. ते खऱ्या अर्थाने सर्वपक्षीय नेतृत्व होते. नाशिक जिल्ह्याचे पालकत्व करणारे बहुआयामी व्यक्तिम त्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. आपली विचारधारा त्यांनी कधीही सोडली नाही. सर्वांना हवेहवेसे वाटणारे नेतृत्व म्हणजे विनायकदादा, असे त्या म्हणाल्या आपल्या भाषणात उपस्थितांना संबंधित करताना केले.

निफाड तालुक्याच्या राजकीय, सामाजिक, सहकार, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रावर आपल्या कार्यकर्तृत्वाची अमीट छाप उमटविणारे माजी मंत्री तथा वनाधिपती विनायकदादा पाटील यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा भावी पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या वनाधिपती विनायकदादा पाटील प्रतिष्ठानचा शुभारंभ खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख तर विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात करण्यात आला.

यावेळी विनायकदादांच्या कार्याचे स्मरण करताना उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला उजाळा दिला.कार्यक्रमास ज्येष्ठ नेते सुरेशबाबा पाटील, खासदार भास्करराव भगरे, आमदार दिलीपराव बनकर, मविप्र सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, माजी आमदार संजय चव्हाण, सहकार नेते रमेशचंद्र घुगे, माजी आमदार नानास-ाहेब बोरस्ते, रयत शिक्षण संस्था विश्वस्त ड भगीरथ शिंदे, माजी मविप्र अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे, प्रा. अशोकराव सोनवणे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. होते.कार्यक्रमात प्रसिद्ध गीतकार संजय गिते यांनी आपल्या सुरेल गायनाने उपस्थित नागरिकांना मंत्रमुग्ध केले. गीत-संगीताच्या कार्यक्रमामुळे उद्घाटन सोहळ्याला सांस्कृतिक रंगत प्राप्त झाली. खा.सुळे आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या .त्या काळातील राजकारण आणि समाजकारण अधिक व्यापक आणि वैचारिक होते. यशवंतराव चव्हाण यांच्या सुसंस्कृत राजकारणाचा संस्कार त्या पिढीवर झाला होता आणि तोच सुसंस्कृतपणा विनायकदादांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येत होता, असे का. सुळे यांनी सांगितले. वाचन संस्कृती कमी होत असल्याची खंत आजच्या काळात मोबाईल आणि रिल्सच्या वाढत्या प्रभावामुळे वर्तमानपत्र वाचन आणि दूरदर्शनवरील गंभीर कार्यक्रम पाहण्याची सवय कमी होत असल्याची खंत खासदार सुळे यांनी व्यक्त केली.त्या म्हणाल्या, आमच्या घरात सकाळी सात वाजता वृत्तपत्र येत असे आणि ते नियमितपणे वाचले जात असे. संपादकीय लेख वाचणे हा पवार साहेबांनी घालून दिलेला नियम होता. पत्रकारांनी राजकीय नेतृत्वावर टीका केलीच पाहिजे आणि ती लोकशाहीची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. म ात्र, आज समाजातील सुसंवाद कमी होत चालला आहे. मतभेद असले तरी संवादाची परंपरा कायम राहिली पाहिजे, असे त्या म्हणाल्या.मराठी भाषा आणि साहित्य संवर्धनासाठी प्रतिष्ठानने काम करावे नाशिक जिल्ह्याची ओळख कुसुम ाग्रजांच्या साहित्यामुळे जगभरात आहे. मात्र, आज मराठी भाषा आणि मराठी शाळांची परिस्थिती चिंताजनक आहे. मराठी ही आपली आई असून तिच्या संवर्धनासाठी विनायकदादा पाटील प्रतिष्ठानने ठोस काम करावे, असे आ-वाहन सुळे यांनी केले.

विनायकदादा हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते लेखक आणि साहित्यिकही होते. त्यांचे मन अत्यंत हळवे हो-ते आणि त्यामुळे त्यांच्या लेखनातून संवेदनशीलता प्रकट होत असे, असे त्यांनी सांगितले.

संसदेत मराठीतून भाषण करणारे खासदार भास्करराव भगरे यांचाही त्यांनी विशेष उल्लेख केला.

दादांचे साहित्य व लेखन डिजिटल स्वरूपात जतन करण्याचे आवाहन यशवंतराव चव्हाण यांची पत्रे व अन्य साहित्य जसे जतन करण्यात आले, त्याचप्रमाणे विनायकदादा पाटील यांची




पुस्तके, लेखन, भाषणे आणि वैचारिक साहित्य डिजिटल स्वरूपात जतन करण्यात यावे, असे आवाहन सुप्रिया सुळे यांनी केले.

विनायकदादांचे कार्य आणि विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रतिष्ठानने व्यापक उपक्रम हाती घ्यावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विनायकदादांच्या कार्यासाठी आपण आणि आपला पक्ष सदैव उभा राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

शेतकरी हा विकासाच्या केंद्रस्थानी असला पाहिजे

विनायकदादांची नाळ काळ्या मातीशी जोडलेली होती. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे सांगताना सुप्रिया सुळे यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले. कांद्याचा प्रश्न सोडविण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधींनी एकत्रित प्रयत्न करावेत, असे त्यांनी सांगितले. विविध जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्यानंतर आंदोलन का करावे लागते आणि उत्पादक शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्षात किती पैसा पडतो, हा महत्त्वा-चा प्रश्न असल्याचे त्यांनी नमूद केले. महागाई वाढत असताना सरकारकडे स्पष्ट धोरण असणे आवश्यक आहे. पायाभूत सुविधा उभ्या करणे महत्त्वाचे असले तरी त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. राजकारण होत राहील, मतभेदही होतील; मात्र शेतकऱ्यांना वाचविणे हाच सर्वांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असला पाहिजे, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.सुसंस्कृत राजकारणाचा वारसा जपण्याचे आवाहन करत सरकारमधील लोकांनाच काही वेळा आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरावे लागते, ही परिस्थिती चिंत-ाजनक असल्याचे सांगत सुप्रिया सुळे म्हणाल्या की, राजकीय मतभेद असले तरी समाजहित आणि शेतकऱ्यांचे प्रश्न यासाठी सर्वांनी एकत्र यायला हवे. विनायकदादांनी आयुष्यभर जपलेला सुसंस्कृतपणा, सर्वसमावेशकता आणि माणसे जोडण्याची परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी नव्या पिढीची असल्याचे सांगत त्यांनी वनाधिपती विनायकदादा पाटील प्रतिष्ठानला शुभेच्छा दिल्या

प्रास्ताविकात वि.दा. व्यवहारे यांनी सांगितले की, निफाड ही भूमी न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आहे. या भूम ीला वैचारिक, सहकार, शिक्षण, कृषी, साहित्य आणि काव्य अशा विविध क्षेत्रांचा समृद्ध वारसा लाभला आहे. या सर्व क्षेत्रांमध्ये आपल्या कार्याने उंच स्थान निर्माण करणारे आणि भीष्माचार्या सारखं व्यक्तिमत्त्व म्हणजे विनायकदादा पाटील होते. त्यांचे विचार आणि कार्य जनमानसात अधिक व्यापकपणे रुजावे, यासाठी वनाधिपती विनायकदादा पाटील प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. सहा वर्षांपूर्वी दसर्याच्या दिवशी निफाडचे 'सोनं' हरपल्याचे सांगत आमदार दिलीपराव बनकर त्यांनी विनायकदादांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. दसर्याच्या दिवशी दादा गेले आणि निफाडचे सोनंच गेले. नाशिक जिल्ह्यातील सर्वगुणसंपन्न नेतृत्व म्हणून विनायकदादांकडे पाहिले जात होते. कादवा-विनता संगमाच्या परिसरातून त्यांचे नेतृत्व फुलत गेले. राष्ट्रवादी विचारांचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे ते अत्यंत जवळ-चे मित्र असल्याने त्यांची ओळख संपूर्ण महाराष्ट्रात होती.२००४ च्या निवडणुकीतील आठवणींना उज-ाळा देताना गीते म्हणाले की, अभी नहीं तो कभी नहीं अशी साद निफाड तालुक्यातील जनतेला पिं-पळगाव येथील सभेत घालण्यात आली आणि जनतेने तब्बल ४७ हजार मताधिक्याने निवडून दिले. या विजयामुळे निफाड तालुक्याला प्रथमच मंत्रीपदाची संधी मिळाली, अशी आठवणही त्यांनी सांगितली. तर आमदार गोकुळ गिते यांनी पिं-पळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बिनविरोध निवडणुकीसह विविध प्रसंगांचा उल्लेख करत त्यांनी दादांच्या नेतृत्वाची आठवण करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोल-ताना खासदार भास्करराव भगरे यांनी विनायकदादांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठा गुण म्हणजे माणसे जोडण्याची त्यांची विलक्षण क्षमता असल्याचे सांगितले.ते म्हणाले, दादांसारखा नेता पुन्हा निर्माण होणे कठीण आहे. नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा त्यांच्या मनात होता. दादांच्या जाण्याने नाशिक जिल्ह्यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.राजकारणाच्या पलीकडे जाऊन समाजकारण करणे हा विनायकदादांचा स्थायीभाव होता. त्यांचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते. कृषी, सहकार, शिक्षण आणि ग्रामीण विकासासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. निलगिरी शेतीसारख्या विषयांसाठीही त्यांचे योगदान महत्त्वाचे होते, असे भगरे यांनी नमूद केले.

विनायकदादांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रतिष्ठानला आवश्यक ती मदत मिळावी आणि या कार्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी सहकार्य करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी जिल्हाभरातून विनायक दादा पाटील यांच्यावर प्रेम करणारे राजकीय सामाजिक शैक्षणिक सहकार कृषी प्रशासकीय सेवेतील मान्यवरासह प्रतिष्ठान अध्यक्ष व सर्व विश्वस्त उप-स्थित होते.

# भटक्या-विमुक्तांच्या मुक्तीपासून सन्मानाच्या वाटचालीपर्यंत

३१ ऑगस्ट हा दिवस भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि भावनिक दिवस आहे. हा केवळ एखादा स्मृतिदिन नाही, तर अन्याय, कलंक, उपेक्षा आणि सामाजिक बहिष्काराच्या दीर्घ इतिहासातून स्वाभिमान, समानता आणि मानवी प्रतिष्ठेकडे वाटचाल करण्याचे प्रतीक आहे. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्यास २०२५ मध्ये अधिकृत मान्यता दिली. त्यामुळे हा दिवस साजरा करताना केवळ औपचारिक कार्यक्रम न करता भटके-विमुक्त समाजाच्या ऐतिहासिक वेदना, वर्तमानातील प्रश्न आणि भविष्यातील संधी यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

भारतीय समाजरचनेत भटक्या आणि विमुक्त जम ातींचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. उपजीविकेच्या पारंपरिक साधनांनुसार, जीवनपद्धतीनुसार आणि भौगोलिक परिस्थितीनुसार अनेक समूहांनी भटकंतीचे जीवन स्वीकारले. काही समूह पारंपरिक कला, लोककला, पशुपालन, हस्तकला, मनोरंजनाचे विविध प्रकार, औषधी वनस्पतींचे ज्ञान, लघु व्यापार, लोहारकाम, दगडकाम, बांधकामाशी संबंधित कौशल्ये किंवा इतर पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून होते. स्थिर गावव्यवस्थेच्या चौकटीबाहेर राहणाऱ्या या समूहांनी आपल्या ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या बळावर समाजजीवनात महत्त्वाचे योगदान दिले. मात्र स्थिर वस्ती, जमीन आणि पारंपरिक सामाजिक संस्थांच्या अभावामुळे त्यांना सामाजिक सुर-क्षेपासून आणि संस्थात्मक संधींपासून मोठ्या प्रमाणावर वंचित राहावे लागले.

भटके आणि विमुक्त या संज्ञांमध्ये सूक्ष्म फरक आहे. भटक्या जमातींच्या जीवनपद्धतीत स्थलांतर आणि भटकंतीला विशेष महत्त्व असते; तर विमुक्त' ही संज्ञा ब्रिटिश राजवटीत गुन्हेगार जमाती' म्हणून कलंकित करण्यात आलेल्या आणि नंतर त्या कायदेशीर कलंकातून मुक्त झालेल्या समुदायांसाठी वापरली जाते. महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त समाजात अनेक विविध जाती-जमातीं-चा समावेश होतो. या विविध समूहांची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती एकसारखी नसली तरी ऐतिहासिक उपेक्षा आणि सामाजिक कलंकाचा अनुभव अनेक समूहांना समानपणे सहन करावा लागला आहे.

या समाजाच्या इतिहासातील सर्वांत काळा अध्याय म्हणजे ब्रिटिशांनी लागू केलेला क्रिमिनल ट्राइब्ज क्ट' होय. १८७१ मध्ये करण्यात आलेल्या या कायद्याच्या काही संपूर्ण जाती-जमातींना त्यांच्या वैयक्तिक कृतींवर नव्हे, तर केवळ जातीय ओळखीच्या आधारे गुन्हेगार' म्हणून नोंदविण्याची अमानुष व्यवस्था निर्माण झाली. म्हणजेच एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला किंवा नाही, यापेक्षा ती व्यक्ती कोणत्या समुदायात जन्माला आली आहे, याला अधिक महत्त्व देण्यात आले. हा आधुनिक न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच छेद देणारा प्रकार होता.

या कायद्यामुळे संपूर्ण समुदायांवर संशयाची छाया पडली. त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात आले, नोंदणी आणि देखरेखीच्या विविध यंत्रणा उभ्या करण्यात आल्या आणि अनेकांना तथाकथित सेटलमेंट'मध्ये ठेवण्यात आले. त्यांच्या स्वातंत्र्यावर आणि उपजीविकेच्या पारंपरिक मार्गांवर निर्बंध आले. परिणामी सामाजिक कलंक, आर्थिक दारिद्र्य आणि प्रशासकीय नियंत्रण यांचे दुष्टचक्र निर्माण झाले. सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे गुन्हेगार' हा शिक्का व्यक्तीच्या कृतीशी जोडलेला नसून जन्माशी जोडला गेला. अशा प्रकारची जन्मजात गुन्हेग-ारीची कल्पना मानवी प्रतिष्ठेला नाकारणारी होती.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या व्यापक इतिहासातही या समुदायांचे योगदान अनेकदा पुरेसे अधोरेखित झालेले दिसत नाही. ब्रिटिश सत्तेविरुद्ध विविध स्वरूपात प्रतिकार करणाऱ्या अनेक स्थानिक समुदायांवर ब्रिटिश प्रशास-नाने कठोर नियंत्रण ठेवले. भटक्या-विमुक्त समाजा-तील विविध समूहांच्या इतिहासात स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अस्तित्वासाठी संघर्षाची अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच या समाजाचा इतिहास केवळ दारिद्र्याचा किंवा मागासलेपणाचा इतिहास म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. तो प्रतिकाराचा, जिद्दीचा, सांस्कृतिक सातत्याचा आणि अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या संघर्षाचा इतिहास आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीसमोर या ऐतिहासिक अन्यायाचे निराकरण करण्याचे आव्हान होते. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी ब्रिटिशकालीन क्रिमिनल ट्राइब्ज क्ट-१८७१' रद्द करण्यात आला आणि त्या कायद्याच्या कक्षेत असलेल्या समुदायांना विमुक्त' म्हणून ओळख मिळाली. त्यामुळे ३१ ऑगस्ट हा दिवस या समाजाच्या दृष्टीने एका ऐतिहासिक बंधनातून मुक्ततेचे प्रतीक ठरला.

मात्र कायदा रद्द झाला म्हणून सामाजिक कलंक तात्काळ संपला नाही. कायद्याच्या पुस्तकातील गुन्हेग-ार' हा शब्द काढून टाकणे सोपे होते; पण समाजाच्या मानसिकतेतील संशय आणि पूर्वग्रह दूर करणे अधिक कठीण होते. अनेक दशकांनंतरही भटक्या-विमुक्त समाजातील काही घटकांना पोलिसी संशय, सामाजिक अविश्वास आणि भेदभावाचा सामना करावा लागल्याचे सामाजिक अभ्यासांतून आणि विविध अनुभवांतून दिसून येते. एका अन्यायकारक कायद्याने निर्माण केलेली म नसिकता पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते, याची ही जाणीव करून देणारी बाब आहे.

भटक्या-विमुक्त समाजाच्या वर्तमान प्रश्नांकडे पाहिले तर शिक्षण हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. स्थिर निवा-ऱ्याचा अभाव, वारंवार स्थलांतर, आर्थिक अस्थिरता, शाळेपासून भौगोलिक अंतर आणि कागदपत्रांची कम तरता यामुळे अनेक मुलांना सातत्याने शिक्षण घेणे कठीण जाते. एखादे मूल शाळेत दाखल झाले तरी कुटुंबाच्या स्थलांतरामुळे त्याचे शिक्षण खंडित होऊ शकते. त्याम ुळे केवळ शाळेत प्रवेश देणे पुरेसे नाही; शिक्षणाची सातत्यपूर्णता, वसतिगृहांची उपलब्धता, शिष्यवृत्ती, शैक्षणिक मार्गदर्शन आणि कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्याशी जोडलेली उपाययोजना आवश्यक आहे.

शिक्षणाबरोबरच निवासाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. स्थिर घर हे केवळ निवाऱ्याचे साधन नसून शिक्षण, आरोग्य, मतदानाचा हक्क, सरकारी योजना, बँकिंग, रोजगार आणि सामाजिक सुरक्षितता यांच्याशी जोडलेले असते. ज्यांच्याकडे स्थिर पत्ता नाही, त्यांच्यासाठी अनेक शासकीय प्रक्रियाच कठीण होतात. जन्मनोंदणी, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, आधारसारखी ओळ-खपत्रे, शिधापत्रिका आणि इतर कागदपत्रे मिळविण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींमुळे योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे कागदपत्रे' हा केवळ प्रशासकीय विषय नसून सामाजिक समावेशनाचा मूलभूत प्रश्न आहे.

रोजगाराच्या बाबतीतही भटक्या-विमुक्त समाजासम ोर मोठी आव्हाने आहेत. पारंपरिक व्यवसायांमध्ये आधुनिक बाजारपेठेतील बदलांमुळे उत्पन्नाच्या संधी कमी झाल्या आहेत. अनेक पारंपरिक कला आणि कौशल्ये आधुनिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली नाहीत तर ती पुढील पिढ्यांपर्यंत टिकणे कठीण होईल. त्यामुळे पारंपरिक कौशल्यांचे जतन करताना त्यांचे आधुनिक कौशल्यविकास, बाजारपेठ, डिजिटल माध्यमे, सहकारी संस्था आणि उद्योजकतेशी नाते जोडणे आवश्यक आहे. समाजातील युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण, रोजग-ाराभिमुख शिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक व्यापक होऊ शकतो.

महिलांच्या प्रश्नांकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. भटक्या-विमुक्त समाजातील महिलांना गरिबी, अस्थिर उपजीविका, शिक्षणाचा अभाव, आरोग्यविषयक अडचणी आणि सामाजिक असुरक्षितता अशा अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागू शकते. महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य, स्वयं-सहायता गटांची निर्मिती, कौशल्यविकास, आर्थिक साक्षरता, सुरक्षित निवास आणि आरोग्यसेवा यांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. एखाद्या समाजाचा खरा विकास मोजायचा असेल तर त्या समाजातील महिलांची स्थिती आणि मुलींच्या शिक्षणाच्या संधी यांचा विचार करणे अपरिहार्य आहे.

भटके-विमुक्त समाजाच्या सांस्कृतिक संपदेचाही गांभीर्याने विचार झाला पाहिजे. लोककला, लोकपरंपरा, मौखिक इतिहास, लोकसंगीत, कथाकथन, हस्तकला, पारंपरिक ज्ञान आणि जीवनपद्धती ही भारतीय सांस्कृतिक विविधतेची महत्त्वपूर्ण अंग आहेत. आधुनिकतेच्या प्रवाहात या परंपरा नष्ट होऊ नयेत, यासाठी त्यांचे दस्तऐवजीकरण आणि संवर्धन आवश्यक आहे. मात्र संस्कृतीचे संवर्धन करताना त्या समाजाला केवळ लोककलेचे प्रदर्शन' म्हणून पाहणे टाळले पाहिजे. त्यांच्या संस्कृतीचा आदर करण्याबरोबरच त्यांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवास आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांनाही समान महत्त्व दिले पाहिजे.

आज संविधानिक मूल्ये भटके-विमुक्त समाजाच्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी आपल्याला महत्त्वाची दिशा देतात. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली आहे. त्यामुळे जन्म, जात, जीवनपद्धती किंवा सामाजिक पार्श्वभूमीच्या आध-ारावर कोणत्याही व्यक्तीकडे संशयाने पाहणे संविधानाच्या समतेच्या भावनेला विरोध करणारे आहे. भटके-विमुक्त समाजाचा प्रश्न हा केवळ एखाद्या विशिष्ट समाजघटकाचा प्रश्न नसून भारतीय लोकशाहीच्या समावेशकतेची कसोटी आहे.

महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस अधिकृतपणे भटके विमुक्त दिवस' म्हणून मान्य केल्यामुळे या प्रश्नांना नव्याने सामाजिक आणि प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु कोणताही स्मृतिदिन तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा त्या निमित्ताने वास्तवातील प्रश्नांवर ठोस कृती होते. कार्यक्रम, भाषणे आणि गौरव सोहळे आवश्यक असले तरी त्यापलीकडे जाऊन शिक्षण, निवास, रोजगार, आरोग्य, कागदपत्रे आणि सामाजिक सुरक्षा या प्रश्नांवर परिणामकारक उपाययोजना होणे अधिक महत्त्वाचे आहे.

भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समाजातील संवेदनशील घटक यांनी पर-स्पर सहकार्याने काम करण्याची गरज आहे. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनी या समाजाच्या इतिहासाचा, संस्कृतीचा, शिक्षणाचा, अर्थकारणाचा आणि सामाजिक बदलाचा शास्त्रीय अभ्यास वाढवला पाहिजे. त्यांच्या विषयी संशोधन करताना मात्र त्यांच्याकडे केवळ अभ्यासाचा विषय' म्हणून न पाहता त्यांच्या अनुभवांना आणि ज्ञानाला महत्त्व देणे आवश्यक आहे.

विशेषतः नव्या पिढीच्या युवकांना या समाजाच्या प्रश्नांशी जोडणे महत्त्वाचे आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास, उद्योजकता आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्यास भटक्या-विमुक्त समाजातील युवक केवळ रोजगार शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनू शकतात. पारंपरिक कौशल्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास सांस्कृतिक वारसा आणि आर्थिक विकास यांची सांगड घालता येऊ शकते.

३१ ऑगस्टचा भटके-विमुक्त दिन आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो की कायदा बदलला, पण समाजाची मानसिकता किती बदलली? १९५२ मध्ये कायदेशीर मुक्ती मिळाली; परंतु खरी सामाजिक मुक्ती तेव्हाच पूर्ण होईल, जेव्हा कोणत्याही मुलाला त्याच्या जन्माच्या आधारावर कमी लेखले जाणार नाही, कोणत्याही कुटुंबाला केवळ त्याच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे संशयाच्या नजरेने पाहिले जाणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीला सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या पार्श्वभूमीचा पुरावा देत राहण्याची गरज भासणार नाही. कायद्याने दिलेली समानता समाजमानसात उतरली, तरच स्वातंत्र्याचा अर्थ खऱ्या अर्थाने व्यापक होईल.

आज भटके-विमुक्त समाजाकडे दयेच्या नजरेने पाहण्याची नव्हे, तर समानतेच्या आणि सन्मानाच्या नजरेने पाहण्याची गरज आहे. त्यांच्या प्रश्नांकडे केवळ कल्याणकारी योजनांच्या चौकटीतून न पाहता सामाजिक न्यायाच्या व्यापक चौकटीतून पाहिले पाहिजे. त्यांच्यासाठी काय करता येईल?' या प्रश्नाबरोबरच त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी कसे करून घेता येईल?' हा प्रश्नही विचारला पाहिजे. त्यांच्या नेतृत्वाला, अनुभवांना आणि ज्ञानाला विकासाच्या प्रक्रियेत स्थान मिळाले पाहिजे.

३१ ऑगस्ट हा दिवस म्हणून साजरा करताना १९५२ च्या मुक्तीची आठवण ठेवणे आवश्यक आहे; परंतु त्याचबरोबर आजच्या पिढीसमोर उभ्या असलेल्या अदृश्य बंधनांचीही जाणीव ठेवली पाहिजे. शिक्षणा-चा अभाव, भूमिहीनता, अस्थिर निवास, बेरोजगारी, कागदपत्रांचा प्रश्न, आरोग्याच्या सुविधा, सामाजिक पूर्वग्रह आणि आर्थिक असुरक्षितता ही आजची आव्ह-ाने आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि संवेदनशील धोरणांची आवश्यकता आहे.

खऱ्या अर्थाने भटके-विमुक्त दिन साजरा करायचा असेल तर त्या दिवशी केवळ इतिहासाचे स्मरण न करता भविष्याचा संकल्प करावा लागेल. प्रत्येक भटक्या-विम ुक्त मुलाला दर्जेदार शिक्षण, प्रत्येक कुटुंबाला सन्मानजनक निवास, प्रत्येक युवकाला कौशल्य व रोजगाराची संधी, प्रत्येक महिलेला सुरक्षितता आणि आर्थिक स्वावलंबन, प्रत्येक नागरिकाला आवश्यक कागदपत्रे आणि प्रत्येक व्यक्तीला संविधानाने दिलेली समान प्रतिष्ठा मिळवून देण्याचा संकल्प करावा लागेल. हीच त्या ऐतिहासिक मुक्तीची खरी फलश्रुती ठरेल.

भटक्या-विमुक्त समाजाची कहाणी ही केवळ एका समाजाची कहाणी नाही; ती भारतीय लोकशाहीच्या सामाजिक न्यायाच्या प्रवासाची कहाणी आहे. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी एका अन्यायकारक कायद्याची समाप्ती झाली; आता ३१ ऑगस्ट हा दिवस सामाजिक पूर्वग्रह, भेदभाव आणि वंचिततेच्या अदृश्य भिंती मोडण्याच्या नव्या संकल्पाचा दिवस झाला पाहिजे. कायद्याने दिलेली मुक्ती सामाजिक सन्मानात आणि आर्थिक स्वावलंबनात रूपांतरित झाली, तरच विमुक्त' ही संज्ञा केवळ इतिहासाची आठवण न राहता वर्तमानाची जिवंत वास्तवता बनेल. म्हणून भटके-विमुक्त दिनाचा संदेश स्पष्ट आहे की मुक्ती केवळ बंधनांतून बाहेर पडण्यात नाही; तर समान संधी, सन्मान, स्वाभिमान आणि न्यायासह समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रतिष्ठेने उभे राहण्यात आहे.

- डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल - लरसरींश.रिक्षाणपवीर५८सारव्छश.ले

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे देऊन थांबणार नाही, तर मूलभूत सुविधाही पुरविणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## 'फूट प्रिंट ऑफ डिग्निटी' पुस्तकाचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : झोपडपट्टीतील रहिवाशांना मोठ्या प्रमाणात मालकी हक्काचे पट्टे देणारे नागपूर हे देशातील एकमेव शहर आहे. मात्र आम्ही फक्त मालकी हक्काचे पट्टे देऊन थांबणार नाही, तर या वसाहतींमध्ये मूलभूत सुविधा देऊन तेथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर शहरातील झोपडपट्टीधारकांना हक्काचे मालकी पट्टे मिळवून देऊन त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केलेले प्रयत्न आणि त्याअनुषंगाने झाले-ले निर्णय या संपूर्ण प्रक्रियेवर सीएफएसडी (सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट) च्या लीना बुद्धे यांनी लिहिलेल्या 'फूटप्रिंट्स ऑफ डिग्निटी : बिल्डिंग टेन्युअर राइट्स इन अर्बन स्लम्स ऑफ इंडिया' या पुस्तकाचे प्रकाशन आज 'रामगिरी' येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

झोपडपट्टीतील रहिवाशांना मालकीपट्टे मिळणे अतिशय आवश्यक होते. ते दिल्यामुळे त्यांचे जीवन बदलल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणा-ले की, त्यांचा सर्वसमावेशक विकास होण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. झोपडपट्टी विकासासाठी हे पुस्तक दिशादर्शक असणार आहे. मी नागपूरचा महापौर असतानाच या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले होते. त्यामुळे पुढे आमदार म्हणूनही हा विषय लावून धरला. या क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या या पुस्तकाच्या लेखिका लीना बुद्धे यांनीही हा गुंतागुंतीचा विषय अभ्यासपूर्ण मांडला. मुख्यमंत्री झाल्यानंतर मालकी पट्टे देण्याचा मी निर्णय घेतला. अनेक खा-सगी जागांवरही झोपडपट्ट्या वसल्या आहेत. त्यांच्या नियमितीकरणासाठीही शासनाने निर्णय घेतला. या संपूर्ण प्रक्रियेचे या पुस्तकामुळे दस्तावेजीकरण झाले आहे असे सांगत मुख्यमंत्र्यांनी लेखिका श्रीमती बुद्धे यांचे अभिनंदन केले.




नागपुरातील झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे मिळाले याचे संपूर्ण श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे असल्याची भावना लेखिका लीना बुद्धे यांनी मनोगतात व्यक्त केली. झोपडपट्टीधारकांचा प्रश्न हा अतिशय जुना आहे. तो फार कोणी समजून घेतला नाही, मात्र मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्यासाठी मदतीचा हात पुढे करून ठोस निर्णय घेतले. त्यामुळे मालकी हक्क मिळण्याचा मोठा आनंद त्या रहिवाशांना मिळू शकला. हा सारा प्रवास या पुस्तकात मांडला आहे. नागपूर शहरात १२ ते १५ हजार अशा मालकीपट्ट्यांचे वाटप करण्यात आले आहे. हे खूप मोठे कार्य असल्याचे लीना बुद्धे यावेळी म्हणाल्या. याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, डॉ. सुहास बुद्धे, सीएफएसडीतील डॉ. बुद्धे यांचे सहकारी आणि त्यांचे आप्त उपस्थित होते.

# विठाई संस्थेच्या वतीने रोपांचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर - पर्यावरण संवर्धनाच्या जाणीव जागृतीसाठी विठाई बहुउद्देशीय सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने निरनिराळ्या ६५० रोपांचे वाटप करण्यात आले.

पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन पर्यावरण संवर्धनासाठी सामान्यातल्या सामान्य व्यक्तीने पुढाकार घ्यावा ही जाणीव जागृती करण्यासाठी विठाई संस्थेच्या वतीने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे संस्थेच्या वतीने पारिजातक, जाई, जुई, मोगरा, चाफा, जास्वंद, हिमालय पेंट्स, गुलाब या फुलझाडांची, आंबा, पेरू, सिताफळ, जांभूळ, कवठ, बेल या फळझाडांची, वड, पिंपळ, चिंच, कडुलिंब, करंजा, कदंब अशा जंगली झाडांची रोपे लोकांना आवाहन करून मोफत देण्यात आली. याप्रसंगी पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने जाणीव जागृती करून लोकांना वृक्षारोपणाचे महत्त्वही समजावून देण्यात आले. पोष्टर, व भित्तिपत्रकाच्या माध्यमातून लोकांना पर्यावरणाच्या संवर्धनाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. या प्रसंगी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रा-तील मान्यवरांनी भेटी देऊन या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

सामाजिक वनीकरण विभाग, पालवी संस्थेच्या संस्थापिका मंगलताई शहा, वृक्षप्रेमी आनंद नगरकर, विवेक बडवे या सर्वांचे या उपक्रमासाठी मोठे सहकार्य लाभले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विठाई संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ गायकवाड, सचिव रवी ओव्हाळ, उपाध्यक्ष राम मोरे, डॉ. सचिन लादे सर, प्रसाद को-तूर, संजय टोणपे सर, शशिकांत घाडगे सर,अनिल घाडगे सर, बाळकृष्ण डिंगरे, सुनील जगताप सर, ओंकार कापसे, संजय कुलकर्णी, प्रवीण देशपांडे, डॉ. श्रीधर यलमार, रविराज सोनार, मंदार केसकर, प्रताप चव्हाण सर, रामेश्वर कोरे, अजित खिलारे, गणेश काकरंबे, पार्थ गायकवाड, प्रशांत डोंगरे, कीर्ती मोरे, महानंदा डोंबाळे, अंजू सूनगार मॅडम,दिपाली सतपाल,डॉ. क्षितिजा कदम पाटील तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकारी, सदस्य, सहकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवक यांनी अत्यंत जबाबदारीने काम करून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.

# मुंबई-नाशिक महामार्गावर पडघा येथे मद्यधुंद कंटेनर चालकाचा धुमाकूळ; दुचाकीला धडक, तिघे जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव - मुंबई-नाशिक महामार्गावरील पडघा येथील एम.ई.सीबी पॉवर हाऊस गेटसमोर मद्यधुंद अवस्थेत कंटेनर चालवणाऱ्या चालकाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात दुचाकीवरील दोघांसह कंटेनर चालक जखमी झाला असून, तिघांनाही उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर अपघाताच्या गुन्ह्याची नोंद पडघा पोलीस स्टेशन मध्ये करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंटेनर नाशिकहून मुंबईच्या दिशेने जात होता. पडघा परिसरात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने



कंटेनरने दुचाकीला धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील दोघे जखमी झाले. कंटेनर उत्तर प्रदेश राज्यातील असून, चालकाचे नाव अमित पाठक असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांनी पोलिसांसह घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांच्या तत्परतेमुळे महामार्गावरील वाह-तूक सुरळीत ठेवण्यात आली. दरम्यान, मुंबई -नाशिक महामार्गावर सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून बसविण्यात आलेल्या ब्रेकरमुळे वाहनांचा वेग कमी झाला होता. त्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. महामार्गावर अवजड वाहने चालवताना चालकांनी मद्यपान करून वाहन चालवू नये, तसेच वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. विशेषतः दुचाकीस्वारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेचा अधिक तपास पडघा पोलीस करीत आहेत.

# कायदा-सुव्यवस्थेवर पडघ्यात मंथन; पोलीस पाटलांना कायदेविषयक मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव गावपातळीवर कायदा व सुव्यवस्था राखताना पोलीस पाटलांची भूमिका महत्त्वाची असते. बदलत्या कायद्यांची आणि नव्या तरतुदींची अद्ययावत माहिती त्यांना मिळावी, या उद्देशाने ठाणे ग्रामीण पोलीस दलाच्या वती-ने भिवंडी तालुक्यातील कुरुंद-पडघा येथील बी. बी. पाटील स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या सभागृहात पो-लीस पाटलांसाठी विशेष कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला पोलीस पाटलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गणेशपुरी उपविभाग पोलीस कार्यालयाच्या हद्दीतील पोलीस पाटलांसाठी हे शिबिर घेण्यात आले. यावेळी ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड तसेच गणेशपुरीचे उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झालटे यांनी उपस्थित पोलीस पाटलांशी संवाद साधत विविध कायदेशीर बाबींवर मार्गदर्शन केले. विशेषतः भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय पुरावा कायदा, महिला अत्याचार प्रतिबंधक कायदा आणि कायदा व सुव्यवस्था यासंदर्भातील महत्त्वाच्या मुद्द्यांची माहिती यावेळी देण्यात आली. गावातील विविध घटना, तक्रारी आणि कायदा-सुव्यवस्थेशी संबंधित परिस्थितीत पोलीस पाटलांनी कोणती भूमिका बजावावी, तसेच कायदेशीर प्रक्रियेची माहिती कशी उपयोगी ठरू शकते, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी पडघा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांसह पोलीस अधिकारी उपस्थित होते. या उपक्रमात गणेशपुरी उपविभागातील सुमारे ११० पोलीस पाटलांनी सहभाग नोंदविला. कायद्यांमध्ये होत असलेल्या बदलांची माहिती थेट अधिकाऱ्यांकडून मिळाल्याने शिबिर पोलीस पाटलांसाठी उपयुक्त ठरले.

# पडघा वनविभागात विद्यार्थिनींचे रक्षाबंधन; राखीच्या धाग्यातून वनरक्षणाचा संदेश





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव - रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधून भिवंडी तालुक्यातील पडघा वनविभाग कार्यालयात शारदा विद्यालय, पडघे येथील इयत्ता सहावी आणि सातवीच्या विद्यार्थिनींनी वनविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना राख्या बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. या उपक्रमातून विद्यार्थिनींनी अधिकारी व कर्मचाऱ्यांप्रती आपुलकी व्यक्त करण्यासोबतच वन, पर्यावरण आणि राखीच्या धाग्यातून वनरक्षणाचा संदेश दिला. रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून एकमेकांच्या संरक्षणाची आणि जबाबदारीची भावना जपणारा सण आहे. याच भाव-नेतून विद्यार्थिनींनी वनविभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींच्या या अनोख्या उपक्रमामुळे वनविभाग कार्यालयातील वातावरण आनंदमय झाले. यावेळी पडघा वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी रमेश रसाळ, शिपाई महेंद्र भेरे ,वाहुली वन व्यवस्थापन समितीचे सदस्य गणेश मते , शारदा विद्यालयातील शिक्षक जयश्री सोनवणे, गौरी भामरे, विशाल देवरे, कर्मचारी सुयोग वेखंडे उपस्थित होते. यावेळी पडघा वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थिनींच्या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे उपस्थितांनी सांगितले. 'राखीच्या धाग्यातून नाते जुळले, तर निसर्गरक्षणाचा संकल्पही दृढ झाला,' असा भावनिक संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

**स्वामी कुवलयानंद यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाला राज्यपालांची उपस्थिती**

# योगाला शिक्षण, रोजगार आणि राष्ट्र उभारणीशी जोडावे : राज्यपाल जिष्णु देव वर्मा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पुणे : भारताच्या युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी योगाला शाळा-महाविद्यालयांच्या दैनंदिन जी-वनाचा भाग बनविणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात पात्र योग शिक्षक अथवा प्रशिक्षकाचे स्वतंत्र पद निर्माण केले पाहिजे. यामुळे युवकांच्या आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकासासोबतच प्रशिक्षित योग व्यावसायिकांसाठी रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण होतील, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

लोणावळा येथील कैवल्यधाम योग संस्थेत स्वामी कुवलयानंद यांच्या १४३व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत हो-ते. यावेळी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, कैवल्यधामचे सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, प्रबंधक परिषदेच्या सदस्या पुष्पा मांडके उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले, भारताकडे युवा शक्ती मोठ्या प्रमाणात असून त्याचा योग्य वापर केल्यास तो देशा-चा सर्वात मोठा लोकसंख्याशास्त्रीय लाभांश ठरू शकतो. योगामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, शारीरिक तंदुरुस्ती, भावनिक संतुलन आणि आत्मजागरूकता वाढण्यास मदत होईल. त्यामुळे योग हा केवळ अधूनमधून केला जाणारा उपक्रम न राहता शिक्षणव्यवस्थेचा नियमित भाग झाला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

योगाच्या माध्यमातून जागतिक योग व वेलनेस अर्थव्यवस्था उभारण्याची भारताला मोठी संधी आहे. योग पर्यटन, प्रशिक्षण, संशोधन, डिजिटल व्यासपीठे, उपकरणे, वस्त्रे आणि विविध सेवांच्या माध्यमातून एमएसएमई, स्टार्टअप, महिला उद्योजक, कारागीर व स्थानिक समुदायांसाठी रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होऊ शकतात. योगाच्या माध्यमातून 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत २०४७'च्या उद्दिष्टांना चालना देता येईल, असे राज्यपालांनी नमूद केले.

राज्यपाल म्हणाले, कैवल्यधाम ही केवळ योग संस्था नसून भारताच्या प्राचीन ज्ञानपरंपरेला आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनाची जोड देणारी संस्था आहे. स्वामी कुवलयानंद यांनी १९२४ मध्ये कैवल्यधामची स्थापना करून योगाच्या वैज्ञानिक अभ्यास आणि संशोधनाची भक्कम पायाभरणी केली. त्यांनी सुरू केलेले 'योग मीमांसा' हे नियतकालिक आजही प्रकाशित होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. कैवल्यधामने राज्यातील विद्यापीठांशी शैक्षणिक भागीदारी करावी, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली.

योग अभ्यासक्रम तयार करणे, शिक्षकांना प्रशिक्षण व प्रमाणपत्र देणे, संशोधन करणे आणि विद्यार्थी जी-वनात योगाचा समावेश करण्यासाठी कैवल्यधामने विद्यापीठांना सहकार्य करावे. तसेच भारतासह जगभरात आपली केंद्रे विस्तारावीत आणि देशातील इतर जुन्या योग संस्थांना सोबत घेऊन राष्ट्रीय पातळीवर कार्य करावे, असे आवाहनही राज्यपाल वर्मा यांनी केले.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनीही योगाच्या माध्यमातून शांततेचा संदेश जगभर पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. स्वामी कुवलयानंदजींच्या पत्रांचे पुस्तक प्रकाशित झाल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. या पत्रांमधून तरुण विद्यार्थ्यांना जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आणि प्रगतीचा मार्ग समजण्यास मदत होईल, असे प्रभू यांनी सांगितले.

कैवल्यधामचे सचिव व मुख्य कार्यकारी अधिकारी सुबोध तिवारी यांनी प्रास्ताविक केले. कैवल्यधामच्या माध्यमातून सुरू असलेल्या उपक्रमाबाबत त्यांनी माहिती दिली.

यावेळी विद्यार्थी, कैवल्यधाम परिवारातील सदस्य तसेच आयएनएस शिवाजीचे अधिकारी उपस्थित होते.

# दोन बालविवाह रोखण्यात पंढरपूर पोलीसांना यश

## निर्भया पथकाची पुन्हा कारवाई, पंढरपूर ग्रामीण व तालुका हद्दीतील घटना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : निर्भया पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीप्रमाणे पंढरपूर ग्रामीण हद्दीत व पंढरपूर तालुका हदिदत असे दोन एकाच दिवशी बालविवाह दि.३० ऑगस्ट रोजी १२.३० वाजता होणार होते. मात्र,निर्भया पथकाने वेळीच पावले उचलत १५ वर्षे वयाच्या दोन्ही मुलींचे बालविवाह रोखले आहेत. या मुलींना पोलीसांनी पुन्हा एक प्रकारे जीवनदान दिले आहे.

पंढरपूर ग्रामीण पोलीस स्टेशन व पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत या दोन्ही ठिकाणी निर्भय पथक टिम रवाना करुन त्या ठिकाणी जावुन चौकशी केली. तेव्हा मुलीचे नातेवाईकांनी आधारकार्ड दाखवताच एका मुलीचे वय हे फक्त १४ वर्षे ११ महिने व दुस-या मुलीचे वय हे १५ वर्षे असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, पोलीस पथकाने जास्तीची चौकशी करत त्यांचा शाळा सोडल्याचा दाखला मिळवला. त्यावरही त्यांचे वय तसेच दिसुन आले. त्यानंतर मंडपातील मंडळींना व वडीलांना योग्य ती समज देवुन सदर बालविवाह रोखण्यात आलेला आहे. त्या अल्पवयीन मुलीस बालकल्याण समिती सोलापूर यांच्यासमक्ष पुढील कार्यवाहीकरीता हजर करण्यात आले. या घटनेमूळे पंढरपूर तालुक्यात बालविवाह लावणाऱ्यांचे व करणाऱ्यांचे धाबे दणानले आहेत.

ही कारवाई पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रेरणा कट्टे, सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, यांच्या मार्गदर्शनाखाली निर्भया पथक प्रमुख पोलीस उपनिरीक्षक सुप्रिया यादव-रावण, पोसई भोसले, पंढरपूर तालुका पो ठाणे., पोकॉ शशिकांत सावंत, वाघे , सपोफौ अरुण राजकर, पोकॉ काळे, चापोकॉ माळी,यांनी पार पाडली आहे.

**निर्भया पथकाचे आवाहन–**

निर्भया पथक पंढरपूर यांनी पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, पंढरपूर ग्रामीण तसेच करकंब पोलीस ठाणे हद्दीतील सर्व जनतेला आवाहन केले आहे की, अशा घटना या वारंवार होत आहेत.अल्पवयीन मुलींचे जीवन हे खुलण्याआधीच तिच्यावर जबाबदारींचे ओझे वाहणे बंद करावे. जर अशा प्रकारचे बालविवाह होत असल्यास निर्भया पथकास संपर्क करावा. कोणी अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य करेल अशा लोकांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे.

# एस.टी. महामंडळाचा संचित तोटा ११००० हजार कोटींवर, दररोज १.६० कोटींचा तोटा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर - सर्वसामान्य नागरिकांच्या दळणवळणाचे साधन असलेल्या राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटी समोरील आर्थिक अडचणी दिवसेंदिवस वाढत आहे एस टी महामंडळाचा संचित तोटा ११००० हजार कोटींच्या रुपयांवर पोहोचला असून दररोज एसटी महामंडळाचा १.६० कोटी तोटा सहन करावा लागत आहे. गेले ४५ वर्षापासून एसटीच्या तोट्यात सातत्याने वाढ होत आहे. या तोट्यात नऊ वर्ष महामंडळ नफ्यात राहिले आहे.

राज्यात दररोज ५० लाखाहून अधिक प्रवासी प्रवास प्रवास करत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला विद्यार्थी, विविध योजनेमधील लाभार्थी व खेळाडू सवलती दिल्या जातात या सोबतीत रक्कम शासनाकडून अनुदानितच्या स्वरूपात मिळत असली तरी डिझेल व कर्मचाऱ्यांची वेतन देखभाल दुरुस्ती आणि शासकीय खर्चाचा मोठा बहार महामंडळावर आहे परिणामी एसटीच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होत आहे.

एस टी महामंडळाच्या आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी उत्पन्नाचे नवे स्तोत्र निर्माण असल्याबरोबरच खर्चात कपात करण्याच्या उपाययोजना सुरू करण्यात आले आहेत एसटीच्या मालकीच्या जागांच्या बोटी बांधा वापरा आणि हस्तांतरित करा तत्वावर विकास करून त्यातून महसूल मिळवण्यास प्रयत्न केला जाणार आहे तसेच प्रवाशांना आर्थिक चांगली सेवा देतानाच महामंडळाच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी नवीन सेवा उपक्रम राबवण्यावर भर दिला जाणार आहे.

९०००० कर्मचाऱ्यांचा एस टी महामंडळाच्या सुमारे ९० हजार कर्मचारी अनेक पदे रिक्त असून त्या पदावरील परिणाम होतो आहे. रिक्त पदे भरण्याबरोबर कर्मचाऱ्यांची वेतन डिझेल आणि देखभालीचा खर्च हा खर्च नियंत्रित करणे हा मोठा महामंडळाला मोठे आव्हान आहे.

# मनमाडमध्ये निर्माता-दिग्दर्शक संजय सोनवणे यांचा उत्स्फूर्त सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मनमाड प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे : खानदेशच्या मातीतून आपल्या कलागुणांच्या जोरावर पुढे येत मराठी कला-संस्कृतीच्या क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे निर्माता-दिग्दर्शक तथा गीतकार संजय सोनवणे यांचा मनमाड येथे विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या कलाक्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल आयोजित या सत्कार सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह कलाकार आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनमाड येथील पळवी मंगल कार्यालयात एका चित्रपटाच्या ऑडिशनच्या निमित्ताने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी संजय सोनवणे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांना शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

संजय सोनवणे यांनी खानदेशातील कला, संस्कृती आणि स्थानिक प्रतिभेला व्यापक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. नवोदित कलाकारांना संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे तसेच खानदेशी बोलीभाषा आणि संस्कृतीचा कलाक्षेत्रातून प्रसार करणे, या कार्यामुळे त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे नांदगाव तालुका अध्यक्ष प्रज्ञानंद जाधव यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी सागर आर्ट फिल्म्सचे निर्मिती दिग्दर्शक हिरामण मनोहर, गीतकार विनोद अहिरे, डिजिटल मीडिया पत्रकार संघाचे अध्यक्ष नाना अहिरे, केशव पाटील, रोशन बैरागी यांच्यासह मनमाड-नांदगाव परिसरातील कलाकार, पत्रकार आणि कला क्षेत्राशी संबंधित अनेक मान्यवर उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना पत्रकार प्रज्ञानंद जाधव यांनी संजय सोनवणे यांच्या कार्याचे कौतुक केले. केवळ निर्माता-दिग्दर्शक म्हणून नव्हे, तर नवोदित कलाकारांना आधार देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

खानदेशच्या कला-संस्कृतीची ओळख राज्याच्या विविध भागांपर्यंत पोहोचविण्यासाठी संजय सोनवणे यांचे प्रयत्न सुरू आहेत. अनेक नवोदित कलाकारांना संधी देत त्यांच्यातील कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्याचे काम ते करत असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.

या सत्कार सोहळ्यामुळे मनमाड परिसरातील कलाकारांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन आणि कलाक्षेत्राला चालना देणाऱ्या अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

संजय सोनवणे यांच्या कार्याला मिळालेला हा सन्मान त्यांच्या कलाप्रवासातील महत्त्वाचा टप्पा असून, खानदेशातील नवोदित कलाकारांसाठी तो निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# उगाव विद्यालयात 'एक राखी सैनिक के नाम' उपक्रम उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी - महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय, उगाव येथे शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी 'एक राखी सैनिक के नाम'* हा देशभक्तीपर उपक्रम उत्साहात संपन्न

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य कैलास गवळी होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षक शिरोळे , तसेच देशसेवेत कार्यरत असलेले सैनिक कलीम शेख, . एजाज मुलानी व . दीपक खेलूकर आणि पत्रकार राजेंद्र जी. थोरात , राहुल कुलकर्णी उपस्थित होते.

देशाच्या सीमेवर तसेच विविध प्रतिकूल परिस्थितीत अहोरात्र कर्तव्य बजावून देशाचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांप्रती विद्यार्थ्यांच्या मनात देशभक्ती, देशप्रेम आणि कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनींनी देशसेवेत कार्यरत असलेल्या सैनिकांना राखी बांधून त्यांचा सन्मान केला.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात सैनिकांप्रती सदैव आदर आणि कृतज्ञता बाळगण्याचे आवाहन केले. सैनिक अहोरात्र जागून देशाचे संरक्षण करतात, त्यामुळेच आपण आपल्या दैनंदिन जीवनात सुरक्षितपणे जगू शकतो, ही जाणीव आजच्या तरुण पिढीला असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमांतर्गत विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी स्वतः राख्या तयार करून त्या एका विशेष बॉक्समध्ये जमा केल्या. या सर्व राख्या देशसेवेचे कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांना पाठविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्यांमधून सैनिकांप्रती असलेला स्नेह, आदर आणि देशप्रेम व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भालचंद्र सूर्यवंशी यांनी केले. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक . नंदाराम ढिकले*, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

'एक राखी सैनिक के नाम' या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रभक्ती आणि सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना रुजविण्याचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.

# माजी विद्यार्थी व समर्पण बहुउद्देशीय संस्थेतर्फे रक्षाबंधन सोहळा उत्साहात संपन्न

**विकास विद्यालय व महात्मा ज्योतिबा फुले विद्यार्थी वस्तीगृहात विद्यार्थ्यांना राखी बांधून दिला स्नेहाचा संदेश**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**






अमरावती : रक्षाबंधनाच्या पावन पर्वानिमित्त समर्पण बहुउद्देशीय संस्था व विकास विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांच्या संयुक्त विद्यमाने विकास विद्यालय तसेच महात्मा ज्योतिबा फुले विद्यार्थी वस्तीगृह येथे रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसोबत रक्षाबंधन साजरे करून स्नेह, आपुलकी, बंधुभाव व सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्यात आला.

यावेळी विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी सारिका तेलमोरे, किरण बोरकर, सारिका जयस्वाल, जयश्री पाटील तसेच गजानन इंगळे, गायकवाड सर (माजी सैनिक), मुकेश ठवरे सर (माजी सैनिक), श्रीमती बिंदुताई (समाजसेविका), ललित मेश्राम, व सुरेखा वैद्य मॅडम यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना राखी बांधून रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे माजी सैनिक गजानन इंगळे, गायकवाड सर व मुकेश ठवरे सर ( नौ सैनिक), यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या सैनिकी सेवाकाळातील प्रेरणादायी अनुभव कथन केले. देशसेवेसाठी कुटुंबापासून दूर राहून बजावलेले कर्तव्य, सैनिकी जीवनातील शिस्त, त्याग, धैर्य आणि राष्ट्रनिष्ठा यांविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या अनुभवकथनातून विद्यार्थ्यांना देशप्रेम व कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा मिळाली. याप्रसंगी श्री. ललित मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती निशा मेश्राम, सहाय्यक शिक्षक प्रविण भागवत सर, अजय बिजवे सर, महेंद्र खैर सर, प्रफुल्ल पवार सर, वस्तीगृह अधीक्षक कैलास उके व चौकीदार जगन कास्देकर उपस्थित होते.

माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाशी असलेले ऋणानुबंध जपत विद्यार्थ्यांसोबत सण साजरा केल्याने विद्यालय व वस्तीगृहात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही विद्यालयाशी असलेले नाते व सामाजिक बांधिलकी जपण्याचा आदर्श या उपक्रमातून निर्माण झाला.

## मुगळीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; ४०० हून अधिक नागरिकांची मोफत तपासणी, ईसीजी-इकोसह औषधांचे वाटप

# ईद-ए-मिलादनिमित्त मुस्तफा ईनामदार यांच्या पुढाकारातून भव्य आरोग्य शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी प्रतिनिधी/निंगप्पा निंबाळ : १५०१व्या ईद-ए-मिलादनिमित्त ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या सामाजिक उद्देशाने मुस्तफा ईनामदार मित्र परिवार आणि नवभारत सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मुगळी येथे भव्य मोफत वैद्यकीय आरोग्य तपासणी व निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला मुगळीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ४०० हून अधिक नागरिकांनी विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला.

शिबिरात १०० हून अधिक नागरिकांची रक्ततपासणी व इतर आरोग्य तपासण्या, तर ८० हून अधिक नागरिकांची हृदयविकार तपासणी करण्यात आली. बाजारात सुमारे २ हजार ते ५ हजार रुपयांपर्यंत खर्च येणाऱ्या विविध तपासण्या तसेच हृदयविकाराच्या महागड्या चाचण्या अत्याधुनिक उपकरणांच्या माध्यमातून मोफत करण्यात आल्या. तपासणीनंतर आवश्यकतेनुसार सर्व रुग्णांना दर्जेदार औषधांचे मोफत वाटप करण्यात आले.

ग्रामीण भागातील नागरिकांना शहरात जाऊन महागड्या वैद्यकीय तपासण्या करणे अनेकदा आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही. ही अडचण लक्षात घेऊन गावातच तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी, निदान व वैद्यकीय मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले. त्यामुळे हे शिबिर केवळ वैद्यकीय उपक्रम न राहता आरोग्य जनजागृती आणि सामाजिक बांधिलकीचा उपक्रम ठरले. शिबिरास दूधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाबासाहेब पाटील आणि मुगळीचे ग्रामविकास अधिकारी अभिमन्यु ताड यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी बाबासाहेब पाटील म्हणाले, ग्रामीण भागातील नागरिकांना शहरात जाऊन महागड्या तपासण्या कराव्या लागतात. आर्थिक परिस्थितीमुळे अनेकजण आवश्यक तपासण्याही टाळतात. अशा शिबिरांमुळे नागरिकांना घराच्या जवळच मोफत आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळतात. हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

ग्रामविकास अधिकारी अभिमन्यु ताड यांनीही आयोजकांचे कौतुक केले. विविध उत्सवांच्या निमित्ताने होणारा अनावश्यक खर्च टाळून आरोग्य शिबिरासारखे समाजोपयोगी उपक्रम राबविणे ही अत्यंत चांगली बाब आहे. अशा उपक्रमांना प्रशासनाची पूर्ण साथ राहील, असे त्यांनी सांगितले.



शिबिरात आलेल्या नागरिकांचे आयोजकांकडून उत्साहात स्वागत करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली. रक्ततपासणीसाठी आवश्यक साहित्य तसेच लॅबोरेटरीची सुविधा शिबिरस्थळीच उपलब्ध करण्यात आली होती. हृदयविकार तपासणीसाठी एउऋ, इको आणि इतर अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांचा वापर करण्यात आला. तपासणीनंतर प्रत्येक रुग्णाला त्याच्या आरोग्यस्थितीनुसार योग्य वैद्यकीय सल्ला देण्यात आला.

एका वृद्ध लाभार्थ्याने अनुभव सांगताना, गेल्या अनेक वर्षांपासून हृदयविकाराचा त्रास आहे. शहरात जाऊन तपासणी करण्याची इच्छा होती; मात्र आर्थिक अडचणीमुळे ते शक्य होत नव्हते. या शिबिरामुळे मोफत हृदयतपासणी झाली. डॉक्टरांनी योग्य सल्ला दिला आणि औषधेही मोफत मिळाली. आयोजकांचे मनापासून आभार, असे सांगितले.

आयोजक मुस्तफा ईनामदार म्हणाले, आमचा उद्देश केवळ शिबिर आयोजित करणे एवढाच नव्हता, तर ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याचे महत्त्व पटवून देणे आणि त्यांना नियमित आरोग्य तपासणीसाठी प्रोत्साहित करणे हा होता. आमच्या प्रयत्नांना ग्रामस्थांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद समाधान देणारा आहे. प्रेषित मुहम्मद साहेब यांच्या विचारांना आचरणात आणत आणि आई-वडिलांकडून मिळालेला समाजसेवेचा वारसा पुढे नेत भविष्यातही अधिक व्यापक व विविध समाजोपयोगी आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचा आमचा मानस आहे.

नवभारत सामाजिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष मेहबूब ईनामदार म्हणाले, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. गरजू नागरिकांना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हे आमचे सामाजिक कर्तव्य आहे. या शिबिरामुळे अनेक नागरिकांची आरोग्य तपासणी झाली आणि त्यांना योग्य वेळी वैद्यकीय मार्गदर्शन मिळाले. हेच आमच्यासाठी खरे यश आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सार्वजनिक आरोग्य केंद्र, दूधनी, जि.प. कन्नड, मराठी व उर्दू शाळा, समर्थ फार्मसीचे विशाल गद्दी तसेच डॉ. अशरफअली शेख यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

सार्वजनिक आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य अधिकारी डॉ. षण्मुख विभुते, श्री. मुजावर, श्री. गुरव आणि कुष्ठरोग तज्ज्ञ डॉ. चोरमुले यांनी रुग्णांची तपासणी केली. महेश झळकी यांनी रक्ततपासणीची जबाबदारी पार पाडली. आरोग्य सेविका रेणुका पवार व मंगल हुक्केरी यांनी कर्तव्य बजावले. गुरुबाई तळवार व ज्योती नंदुरे यांनी आशा सेविका म्हणून सहकार्य केले. तसेच संगीता जमादार व विलास पोतदार यांचेही सहकार्य लाभले.

स्थानिक शाळेने शिबिरासाठी जागा तसेच आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या. समर्थ फार्मसीचे विशाल गद्दी यांनी दर्जेदार औषधे उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य केले.

शिबिरात वृद्ध, महिला, लहान मुले आणि युवा अशा सर्व वयोगटातील नागरिकांनी सहभाग घेतला. अनेक लाभार्थ्यांनी शिबिराचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे आभार मानले. तसेच अशा प्रकारची आरोग्य शिबिरे नियमितपणे आयोजित करण्यात यावीत, अशी अपेक्षाही ग्रामस्थांनी व्यक्त केली.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी मोहसिन भाई ईनामदार आणि त्यांच्या सहकारी मित्रमंडळाने रात्रंदिवस परिश्रम घेतले. शिबिराची पूर्वतयारी, रुग्ण नोंदणी, तपासणीची व्यवस्था, औषध वितरण आणि इतर व्यवस्थापनाची कामे त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडली. ईद-ए-मिलादच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या आरोग्य शिबिरातून सेवा, सामाजिक बांधिलकी आणि आरोग्य जनजागृतीचा संदेश देण्यात आला. ग्रामीण नागरिकांना त्यांच्या गावातच दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणारे हे शिबिर मुगळी परिसरात सामाजिक उपक्रमाचा आदर्श ठरले आहे.